Estd.1962
NAAC 'A++' Accredited by
NAAC (2021) with CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४ महाराष्ट्र
वेबसाईट : www.unishivaji.ac.in
E-mail : appointment.a@unishivaji.ac.in & appointment.b@unishivaji.ac.in
दूरध्वनी :– 2609102, 2609103

संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/ 119 दि. 7/4/2022

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था / अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय : **शैक्षणिक वर्ष 2021–22 वर्षातील ऑक्टो./नोंव्हे. 2021 (हिवाळी सत्रातील) एम. फिल/प्री. पीएच.डी. कोर्सवर्क अभ्यासक्रमाचे परीक्षा अर्ज भरण्याच्या व परीक्षा प्रारंभ तारखेबाबत.**

आपणास कळविणेत येते की, सर्व विद्याशाखेच्या एम.फिल/प्री. पीएच. डी. कोर्सवर्क परीक्षा वर्षातून एक वेळा घेण्यात येत होती. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार सदर परीक्षा पध्दतीमध्ये बदल करण्यात आला असून सर्व विद्याशाखे अंतर्गत एम.फिल/प्री. पीएच. डी. कोर्सवर्क परीक्षा वर्षातून दोन वेळा आयोजित करण्यात येणार आहे.

आक्टो./नोव्हें. 2021 हिवाळी सत्रातील परीक्षेचे आयोजन करण्यात येत असून एम. फिल/प्री. पीएच.डी. कोर्सवर्क अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्यासाठी खालीलप्रमाणे मुदत देण्यात येत आहेत.

| विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात अथवा पद्व्यूत्तर अधिविभागामध्ये परीक्षा अर्ज भरावयाच्या तारखा | महाविद्यालय अथवा पदव्युत्तर अधिविभागाने परीक्षा अर्ज online (Approve) करण्याच्या तारखा | महाविद्यालयांनी विद्यापीठामध्ये परीक्षा अर्जाच्या यादया सादर करावयाच्या तारखा |
|---|---|---|
| विनाविलंब शुल्क | विनाविलंब शुल्क | विनाविलंब शुल्क |
| दि. १२.०४.२०२२ अखेर | दि.१३.०४.२०२२ अखेर | दि.१६.०४.२०२२ |

1. एम. फिल/प्री. पीएच.डी. कोर्सवर्क परीक्षा ज्या त्या अधिविभाग/महाविद्यालय स्तरावर दि. 25 एप्रिल, 2022 ते दि. 15 मे, 2022 या कालावधीमध्ये आयोजित करण्यात याव्यात.
2. एम. फिल/प्री. पीएच.डी. कोर्सवर्क परीक्षा प्रचलित वर्णनात्मक ऑफलाईन पध्दतीने आयोजित करण्यात यावी.
3. प्रश्नपत्रिकेचे स्वरूप अभ्यासक्रम निहाय पूर्वी निश्चित केले प्रमाणेच राहील.
4. सदर परीक्षेसाठी मान्यताप्राप्त प्रश्नप्रत्रिका नियोजकाकडून प्रश्नपत्रिकेचे सिलबंद 03 संच तयार करून संबंधीत प्राचार्य/अधिविभागप्रमुख/ संचालक यांनी त्यापैकी कोणताही एक संच निवडावा.
5. सदर परीक्षेचे कार्यवलन/संचलन/पर्यवेक्षण व परीक्षेच्या अनुषंगाने करावयाची संपूर्ण कार्यवाही महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य/अधिविभागप्रमुख/संचालक यांचे मार्फत करणेची आहे.
6. परीक्षा विभागाकडून संबंधीत अधिविभागास/महाविद्यालयास विद्यार्थ्यांची समरी पाठविली जाईल त्यानुसारच विद्यार्थ्यांची परीक्षा घेणेत यावी.

उपकुलसचिव
प्री. एक्झाम

प्रत– माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी
1. मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था/अधिविभाग,
2. आयटी कक्ष – संबंधीत अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता संगणक प्रणालीतून योग्य ती सुविधा उपलब्ध करून दयावी.
3. परीक्षा विभागातील सर्व संबधित विभाग व अधिकारी – पुढील कार्यवाहीसाठी
4. समन्वयक, इंटरनेट कक्ष – संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता

D/OCT 2021 Exam/Letter1